दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
मुख्य संपादक : अजय भांगे

● बीड/महाराष्ट्र ● रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -७९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

### मोदी-शहांनी अवघा महाराष्ट्र लुटला

**नांदेड (वृत्तसंस्था)**-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट हल्ला चढवला. नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी अवघा महाराष्ट्र लुटला. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात मते मागण्यासाठी जागोजागी फिरत आहेत, असे ते म्हणालेत. मुलगी शिकली, प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे का? असा उपरोधिक टोलाही त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधताना हाणला.उद्धव ठाकरे यांची शनिवारी नांदेड जिल्ह्यातील लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी भाजप महायुतीवर विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट टीका केली. ते म्हणाले, नरेंद्र मोदी व अमित शहांना आता महाराष्ट्राची आठवण झाली आहे. आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र केवळ लुटण्यासाठी आहे असे वाटत होते. पण आता महाराष्ट्रातील लोकांना मतदानाचा अधिकार आहे हे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यानुसार आता ते इथे येऊन मतांचा जोगवा मागत आहेत. या लोकांनी महाराष्ट्राचे सर्व उद्योग लुटून गुजरातला नेता आणि आता निर्लज्जपणे महाराष्ट्राची मते मागता? तुम्हाला काय वाटते? तुम्ही काही केले तरी चालले आणि महाराष्ट्र केविलवाणेपणाने मत देईल? ही लढाई केवळ उद्धव ठाकरे व शिवसेनेची नाही.

### बारामतीत भाजपच्या कोणत्याही नेत्यांनी येऊ नये

# राज्यात अनेक ठिकाणी खूप काम, मी एकटा तिथे पुरेसा - अजित पवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचे अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून महाराष्ट्रात शुक्रवार पासून सभा सुरू झाल्या आहे. राज्यात विविध जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार आहे. मात्र, बारामती मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी याची सभा नको, असे अजित पवार यांनी मत व्यक्त केले होते. याबाबत खुलासा देताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, एका पत्रकाराने मला विचारले की, बारामतीत पवारांची सभा आहे का? तर मी म्हटल की, देशातील राष्ट्रीय नेते जेव्हा राज्यात येतात, तेव्हा ते जिल्ह्यात सभा घेतात. पुण्यात देखील त्यांची सभा असून पुण्यात बारामती येतोच ना, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तालुका स्तरावर नाही, तर जिल्ह्यात सभा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. बारामतीत भाजपच्या कोणत्याही नेत्यांनी येऊ नये, कारण राज्यात अनेक ठिकाणी खूप काम असून मी एकटा तिथे पुरेसा आहे, असेही अजित पवार म्हणाले.

पुणे शहरातील वडगाव शेरी मतदार संघात महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या प्रचारार्थ अजित पवार यांची जाहीर सभा शुक्रवारी आयोजित करण्यात आली. यावेळी अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बारामतीत सभा झाली होती, त्यावेळेस ती गोष्ट वेगळी होती. तेव्हा तिथे अजित पवार नावाचा कोण तरी व्यक्ती उभा होता आणि तेव्हा त्यांना अजित पवारला पराभूत करायचे होते, म्हणून त्यांनी बारामतीत सभा घेतली होती. आता त्यांना पराभूत करायचे नाही, तर मला निवडून आणायचे आहे. म्हणून त्यांनी सभा नाही घेतली. एका पुस्तकात जेष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या संदर्भात धक्कादायक दावा करण्यात आला आहे. परंतु भुजबळ यांनी हे आरोप फेटाळून लावले आहे. यावर अजित पवार म्हणाले की, छगन भुजबळ यांनी याबाबत पुरेसा खुलासा केला आणि ते या बाबत न्यायालयात देखील जाणार आहे असे त्यांनी सांगितल आहे.अलीकडे निवडणुकीचे दिवस जसजसे जवळ येत आहे, तसे विरोधकांकडून महत्त्वाचे प्रश्न जाणीवपूर्वक बाजूला करून नवीन नरेटीव्ह सेट केला जात आहे. हा निवडणुकीचा मुद्दा नाही. राज्य पुढील पाच वर्षांसाठी कोणाच्या हातात द्यायचे, हा मतदारांच्या समोर महत्वाचा मुद्दा आहे, असेही अजित पवार म्हणाले.



## उरण मध्ये छटपूजा उत्साहात संपन्न

**उरण । विठ्ठल ममताबादे**

भारतात सर्वत्र छटपूजा साजरी केली जाते.विशेषता: बिहार,झारखंड, उत्तर प्रदेश राज्यात शटपूजा सण मोठया उत्साहात साजरी केली जाते. या व्रता दरम्यान स्त्रिया निर्जल उपवास करतात. व सूर्याला अर्ध्या देऊन (पूजन करून )हा उपवास सोडण्यात येतो.हे व्रत सौभाग्य व समृद्धीसाठी आणि संतान प्राप्तीसाठी करण्यात येते. या व्रता दरम्यान सूर्यपुत्र यम व त्याची बहिण षष्ठी हिचे पूजन केले जाते दरवर्षी कार्तिक (मराठीच्या अश्विन) महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या षष्ठी तीथीला छट पूजा साजरी केले जाते. बिहारमधून सुरू झालेले हे सण आता संपूर्ण भारतात सर्वत्र साजरा केले जाऊ लागले आहे. महाराष्ट्रातही सर्वत्र मोठया उत्साहात हा सण साजरा केला जातो.

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात हा सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.



उरण मध्ये पिरवाड समुद्रकिनारी महिला वर्गांनी मोठ्या प्रमाणात छट पूजा साजरी केली. यावेळी बसंत पंचमी ट्रस्ट संस्थापक रंजनकुमार यांनी माँ छटी ची कृपा सर्वांवर राहू दे, सर्वांना सुख समृद्धी शांती निरोगी आयुष्य लाभू दे अशी प्रार्थना केली. ७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सूर्याला अर्ध्य देऊन पूजा करण्यात आली तर ८ नोव्हेंबर रोजी सकाळी पूजन करून छटपूजा साजरी करण्यात आली. यावेळी बसंत पंचमी ट्रस्ट चे चेअरमन दिनेश जैस्वाल, प्रेसिडेंट पी.टी. चव्हाण,व्हॉइस प्रेसिडेंट एस एन रॉय, जनरल सेक्रेटरी कामेश्वर शर्मा, ट्रेसरर मनोज कुमार शर्मा, सेक्रेटरी राम चौहान, ऑरग्राईज सेक्रेटरी दिपक कुमार मिश्रा व इतर पदाधिकारी सदस्य मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## बी.एल.ओ.च्या माध्यमातून होणार मतदार माहिती चिठ्यांचे वाटप

**जालना । असलम कुरेशी**

भारत निवडणूक आयोगाकडून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषणा करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार असून बी.एल.ओ. च्या माध्यमातून मतदार माहिती चिठ्यांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे यांनी दिली.

मतदारास त्यांचे जेथे नाव नोंदणी झालेली आहे. असे मतदान केंद्राचे ठिकाण व उक्त यादीतील मतदाराचा अनुक्रमांक यांची माहिती घेणे सुकर व्हावे याकरिता मतदार माहिती चिठ्यांचे ( Voter Information Slip ) वाटप करण्यात येते. सदर मतदार माहिती चिठ्यांच्या मतदान केंद्रस्तरीय



अधिकारी (BLO) यांच्या माध्यमातून दि. ०७.११.२०२४ ते १५.११.२०२४ या कालावधीत वाटप करण्यात येणार आहेत. सदरील मतदार माहिती चिठ्ठी (Voter Information Slip) हा मतदान केंद्र जाणून घेण्याकरिता व मतदानावेळी अनुक्रमांक शोधण्याकरिता मतदारासाठी मदतकारक आहे. परंतु तो ओळखीचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. नोंदणीकृत मतदार किंवा त्यांच्या कुटूंबातील प्रौढ मतदार सदस्यास देण्यात येईल. मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप केवळ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) मार्फतच होईल एकगठ्ठा (Bulk) स्वरूपात वाटप करण्यात येणार नाही. अनाधिकृतरीत्या मतदार माहिती चिठ्ठया वितरण करणे/बाळगणे हे लोकप्रतिनिधीत्व अधिनियमाचा भंग असून असे आढळून आल्यास भारतीय न्याय संहिता २२३ च्या तरतुदी अंतर्गत कारावास अथवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र आहे. सदरील माहिती १०० घनसावंगी विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे यांनी दिली.

## रांजणी येथील मुस्लिम कार्यकर्त्यांचा घाटगे यांना पाठिंबा



**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील मुस्लिम कार्यकर्त्यांनी शुक्रवारी घनसावंगी विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार सतीष घाटगे यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा जाहिर केला.


घनसावंगी विधानसभा मतदार संघात चार प्रमुख उमेदवारांसह २३ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असून प्रचाराला वेग आलेला आहे. अनेक कार्यकर्ते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जात आहे. शुक्रवारी रांजणी येथील सय्यद फहिम अली, मुजाहेद काझी, सय्यद अज़गर अली, जैनू कुरेशी आदींनी घाटगे यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दर्शवला आहे. यावेळी मधुकर देशमुख, दत्ता शिंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वंचित हाच सर्वोत्तम पर्याय इतर पक्षाच्या उमेदवारांचे चारित्र्य तपासा-पुरुषोत्तम वीर

### लिंबागणेश सर्कल वंचितचे पुरुषोत्तम वीर यांनी काढला पिंजून...

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदार संघ हा विकासापासून कोसो दूर आहे. ना चांगले रस्ते आहेत, ना आरोग्य सुविधा, ना पिण्याच्या पाण्याची सोय असे अनेक प्रश्न या प्रस्थापित नेत्यांना कधी महत्त्वाचे वाटले नाही. स्वतःचे घर भरणे हाचा यांचा एकमेव कार्यक्रम राहिलेला आहे. दहा-पाच बगलबच्चे पोसणे म्हणजे विकास नव्हे. गावागावात या प्रस्थापित नेत्यांना व उमेदवारांना जाब विचारा. ही पायघड्या घालण्याची वेळ नाही.असेही पत्रकात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर यांनी म्हटले आहे. त्यांचे पक्ष भ्रष्टाचाराने बरबटले आहेत. (१५००)दीड हजरत लाडकी बहीण खरेदीचा धूर्त शक्कल हाणून पाडा. पक्षाची प्रतिमा पाहून मतदान करा. सत्तेचे रक्त तोंडाला लागलेल्या या प्रस्थापित नेत्यांना कायमचे हद्दपार करा. आता नाही तर पुन्हा कधीच नाही. अशी वेळ आली आहे. तुमच्या लेकरांचे भवितव्य उज्वल करणारी ही निवडणूक आहे. फसव्या भूलथापांना बळी पडू नका तुम्ही ठरवलं तर अशक्य काहीच नाही.यावेळी त्यांना इंगा दाखवाच सर्वोत्तम पर्याय तुमच्या समोर आहे. बीड मतदार संघाचे नंदनवन करण्यासाठी गॅस सिलेंडर चिन्हावर मतदान करा,असे पत्रकात वंचित बहुजन आघाडीचे बीड विधानसभेचे उमेदवार पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर यांनी म्हटले आहे.



## उरणच्या माजी तहसिलदार मनिषा घरत यांचे निधन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरणच्या माजी तहसिलदार मनिषा मनोहर घरत (७५) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.उरण तालुक्याच्या तहसिलदार पदावर व मुंबई उपनगरातील कुर्ला,मुलुंड व ठाणे येथे त्यांनी काम केले असून,त्यांच्या महसूल विभागातील कार्यकाळात विविध क्षेत्रातील व्यक्तींशी माणुसकीचे नाते निर्माण झाले होते.अतिशय प्रेमळ आणि प्रत्येकाला कामात मदत करणाऱ्या मनिषा घरत गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्या मागे सेवा निवृत्त पती, मुलगा,सून आणि नातवंडे असा परिवार आहे. एक प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्यावर उरणच्या बोरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या पत्रकार आशिष घरत यांच्या मातोश्री होत्या.



## बोगस पदवीधराचे एलएलबी,गुणपत्रिका वाटपाचे रॅकेट
# कोहिनूर इन्स्टिट्यूटच्या संचालकाविरुध्द फसवणुकीचा गुन्हा

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

खुलताबादेतील कोहिनूर इन्स्टिट्यूटचा संचालक मजहर खान आणि त्याची पत्नी आस्मा खान यांनी बोगस पदवी आधारे अनेकांना संस्थेच्या माध्यमातून बनावट एलएलबी पदवी आणि गुणपत्रिकेचे वाटप केल्याचे समोर आले आहे. कोहिनूर इन्स्टिट्यूटमधून हे रॅकेट सुरू असल्याचे वकील महिलेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार, उत्तर प्रदेशातील जौनपूर पोलिस ठाण्यात मजहर खान, आस्मा खान आणि इतरांविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लंडनमधील विधी महाविद्यालयात शिक्षण पूर्ण केलेल्या जेबा इद्रीस खान (रा. खान मंजिल, ज्युब्ली पार्क, छत्रपती संभाजीनगर) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, खुलताबादेतील कोहिनूर इन्स्टिट्यूटचा संचालक मजहर खान हा स्वतःला सर्वोच्च न्यायालयासह राज्यातील उच्च

न्यायालयाचा वकील असल्याचे सांगत आहे. ही पदवी उत्तर प्रदे- शातून प्राप्त केल्याचे मजहर खान सांगतो. मात्र कागदपत्रांच्या तपासणीनुसार मजहर खानने कोणतीही सुटी न घेता २०१६ ते २०१९ याकाळात त्याचे महाराष्ट्रात वास्तव्य राहिले आहे. याकाळात त्याने उत्तर प्रदेशातील विधी महाविद्यालयात प्रवेश घेतलेला नाही. सेच कोणतीही परीक्षा दिलेली नाही. या व्यतिरिक्त त्याने इतरांच्या मदतीने २०१९ मध्ये एलएलबीची बोगस पदवी तयार करून घेतली. तिचे नामांकन पीयू १६/६७१०२७३ असे आहे. या पदवीचा संबंध उत्तर प्रदेशच्या जौनपूरमधील वीर बहादूरसिंह विश्वविद्यालयाशी संबंधित सर्वोदय ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटशी असल्याचे भासविले आहे.मुळात या दोन्ही विश्वविद्यालयाचा आपापसांत कोणताही संबंध नाही. मजहर खानने मिळविलेली पदवी आणि गुणपत्रिका या विश्वविद्यालयांनी

**व्हिजिटिंग कार्डवर सत्यमेव जयते**

मजहर खानने स्वतःच्या व्हिजिटिंग कार्डवर सत्यमेव जयते, अशी प्रतिमा छापली आहे. त्यावर त्याने एलएलबी, एलएलएम, पीएचडी आणि अन्य पदव्यांचा उल्लेख केला आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी त्याच्या जाळ्यात ओढल्या गेले आहेत. त्याच्याशी अनेक बोगस पदवीधर जोडल्या गेल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

. त्याची पदवी आणि गुणपत्रिका बोगस आहे. याशिवाय बोगस पदवी आणि प्रमाणपत्र तो तयार करून त्यांचा वापर करत असल्याचे या तक्रारीत म्हटले.तसेच त्याचे इतरांना वाटप करत आहे. मोठ्या प्रमाणावर हे बोगस प्रमाणपत्रांचे वाटप सुरू असून, त्यामागे मोठे रॅकेट असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.



# बदामराव पंडितांच्या घरात थेट प्रवेश मिळतो तसा विजयसिंह पंडितांच्या घरात मिळेल का?

## शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकरांचा सवाल

**गेवराई । प्रतिनिधी**

राज्यात अनेक आमदार, मंत्री, माजी मंत्री मी पाहिले आहेत. परंतु बदामराव पंडित यांच्यासारखा आमदार आणि मंत्री मी आजपर्यंत पाहिला नाही. अठरापगड जातीतील गोरगरीब आणि सामान्य माणूस आजही थेट बदामराव पंडित यांच्या घरात जाऊन त्यांना आपले प्रश्न आणि अडचणी सांगू शकतो. तसे विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांच्या घरात जाऊन तो आपली समस्या सांगून आपले काम करून घेऊ शकतो का? याचा विचार जनतेने करावा असे रोखठोक प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यातील गुळज येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी दिनांक आठ नोव्हेंबर २०२४ रोजी बदामराव पंडित यांना विजयी करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शिवसेना जिल्हा समन्वयक योधाजित पंडित, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, बंडू आप्पा घोलप, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, माजी प स सदस्य विश्वनाथ सोनवणे, माजी सरपंच भाऊसाहेब माखले, युवासेना जिल्हाप्रमुख पवन चव्हाण, सरपंच नवनाथ पारे, अल्पसंख्यांक सेलचे तय्यब पठाण, राम मोहिते, सरपंच संभाजी आहेर, मधुकर आहेर, किरण आहेर, उत्तम गुजर, दलित पँथरचे तालुकाध्यक्ष कैलास पोटफोडे, तात्या शेळके, विलास शिंदे, आप्पासाहेब गोरडे, संभाजी आरबड, महेश शिंदे, सरपंच अविनाश धस, सखाराम चेडे, भीमराव गोरडे, महादेव गोरडे, शिवाजी जाधव,



प्रभाकर गवारे, नारायण गाडे, नाना मते आदींची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार अमरसिंह पंडित आणि उमेदवार विजयसिंह पंडित यांना सोडचिठ्ठी देऊन हनुमान पवार, बद्रीनाथ जाधव फौजी, अजय धोत्रे, आण्णासाहेब पवार, विक्रम घणवट, रामेश्वर जाधव आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

पुढे बोलताना गणेश वरेकर म्हणाले की बदामराव पंडित आमदार म्हणजे सर्वसामान्य माणूस आमदार आहे कोणाची कोणतीही काम असू द्या आबा कधी नाही म्हणत नाहीत. त्यामुळे गेवराईकरांनी त्यांच्याच पाठीशी खंबीरपणे उभे राहावे.

जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की राज्यातल्या सरकारने महागाई वाढवली आहे मात्र शेतकऱ्यांच्या मालाला भाव दिलेला नाही उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यास गोरगरिबांची पुन्हा चांगले दिवस येतील बदामराव पंडित हे सगळ्यांना सोबत घेऊन चालणारे नेते आहेत. विरोधकांच्या पुलथापाला बळी न पडता बदामराव आबांच्याच पाठीशी खंबीरपणे उभा राहण्याचे आवाहन त्यांनी केले. विदाजित पंडित म्हणाले की आमच्या कार्यकर्त्यांना खोटे बोलून विरोधक त्यांच्या बंगल्यावर नेतात आणि गळ्यात रुमाल घालून प्रवेश केल्याच्या बातम्या लावतात मात्र तोच कार्यकर्ता २४ तासात आमच्याकडे पुन्हा परत येतो हाच खरा विरोधकांना धक्का आहे. आज गेवराई मतदार संघात १९९५ ची बदामराव पंडितांची लाट आलेली दिसते. आबांची आणि लोकांची प्रेमाची नाळ झुकलेली आहे आम्हाला बदामराव आबांनी जेवढा वेळ दिला त्यापेक्षा कित्येक पटीने त्यांनी समाजाच्या प्रत्येक घटकाला वेळ दिला आहे. आबांना पराभूत करून गरिबांना हरवण्यासाठी बीडच्या पंडितांकडून एकदा वडील आणि दोनदा अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित या दोन्ही मुलांनी निवडणूक लढवून पाहिली परंतु जनतेने त्यांचा दारुण पराभव करून घरी पाठवले. यावेळी सुद्धा त्यांना कायमचे घरी बसून बदामराव पंडित यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक बाबू कोहले यांनी तर आभार प्रदर्शन किरण अहिरे यांनी केले. कार्यक्रमास चेअरमन संदीप घनवट, प्रभाकर गवारे, दीपक घनवट, महेंद्र काकडे, अतुल वाकडे, विकास तोतरे, राज गवारे, नरेंद्र चव्हाण, शेख ताहेर भाई शेख बालू भाई नामदेव पल्हारे, नंदू हलकडे, ज्ञानेश्वर कुटे, रमेश राठोड, लक्ष्मण राठोड, संदीप आहेर, धर्मराज झेंडे, कल्याण गवारे, सुनील गवारे, सुदर्शन गवारे, भागवत गवारे, तात्यासाहेब गवारे आदींसह शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महायुतीचा धर्म पाळून आमदार शहाजीबापू पाटील यांना भाळवणी गटातून मोठे मताधिक्य देऊ-आ.प्रशांतराव परिचारक

**सांगोला । प्रतिनिधी**

सध्या निवडणुका या सोप्या राहिल्या नाहीत. सांगोला विधानसभा मतदारसंघात पंढरपूर तालुक्यातील भाळवणी गटातील पंधरा गावांचा समावेश आहे.सन २०१९ च्या निवडणुकीत पांडुरंग परिवाराने या गटातून आमदार शहाजीबापू पाटील यांना मोठे मताधिक्य दिले होते. या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाळवणी गटातून आमदार शहाजीबापू पाटील यांना भरघोस मताधिक्य देऊ असा ठाम विश्वास आमदार प्रशांतराव परिचारक यांनी पंढरपूर येथील बैठकीदरम्यान दिला.

. भाळवणी गटातील पांडुरंग परिवारातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक मंगळवार दिनांक ५ नोव्हेंबर रोजी, पंढरपूर येथे घेण्यात आली. यावेळी व्यासपीठावर आमदार प्रशांतराव परिचारक. आमदार शहाजीबापू पाटील , युवक नेते प्रणव परिचारक ,भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार -सावंत, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांतदादा देशमुख यांच्यासह भाळवणी गटातील पंधरा गावातील प्रमुख पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रशांतराव परिचारक म्हणाले, आपण कामाच्या निमित्ताने आमदारांना भेटले पाहिजे. कामासाठी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. आपण सर्वजण महायुतीचे कार्यकर्ते आहोत .राज्यात महायुतीचे सरकार आले पाहिजे . सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांना बहुमत देऊन निवडून आणण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे .सरकारने विकासाच्या अनेक योजना राबविण्यासाठी सांगोला विधानसभा मतदारसंघासाठी ५ हजार कोटीहुन अधिक निधी दिला आहे. राजकारण हे कार्यकर्त्यांच्या जिवावर चालते .या ठिकाणी , महायुतीचा धर्म पाळून आपण सर्वांनी आमदार शहाजीबापू पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देऊया .कोणत्याही परिस्थितीत पक्षनिष्ठा महत्त्वाची असून आघाडीचा धर्म पाळण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन आमदार प्रशांतराव परिचारक यांनी बैठकीदरम्यान केले.

यावेळी आमदार शहाजीबापू पाटील मार्गदर्शन करताना म्हणाले, पंढरपूर तालुक्यातील भाळवणी गटातून पांडुरंग परिवारांने गत निवडणुकीत मोठे सहकार्य केले होते. महायुती सरकारच्या माध्यमातून सांगोला विधानसभा मतदारसंघात पाच हजार कोटीहून अधिक निधी आला. शेवटच्या सव्वा दोन वर्षाच्या काळामध्ये हा निधी प्राप्त झाला व अनेक कामे मार्गी लागली. भाळवणी गटातील अनेक गावात विकासाची कामे केली आहेत .राज्यात सध्या महायुतीचे सरकार निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकसंघपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. माझी राजकीय जीवनातील शेवटची निवडणूक असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद देण्यासाठी व मतदारसंघातील कामे मार्गी लावण्यासाठी भरघोस मतांनी निवडुन द्यावे असे आवाहन करण्यात आले. भविष्यात आपण प्रशांतराव परिचारक यांना यांना सर्वतोपरी सहकार्य करू. सांगोला विधानसभा मतदारसंघात एक मोठी औद्योग वसाहत निर्माण करण्याचे स्वप्न आहे. आपण सर्वांनी मोठ्या मताधिक्याने मला विजयी करावे. पुढील पाच वर्षात तुमची सर्व कामे मार्गी लावण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.

यावेळी प्रास्ताविकात माजी जिल्हा परिषद सदस्य तानाजी वाघमोडे यांनी भाळवणी गटातील नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न मांडले. येत्या पाच वर्षात पांडुरंग परवारातील सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन भाळवणी गटातील विकास कामे करण्यासाठी प्राधान्य द्यावे. आजपर्यंत बापूंच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात, विकास कामे झाली आहेत. यापुढेही आमदार शहाजीबापू पाटील यांनी आमदार प्रशांतराव परिचारक यांना सोबत घेऊन अधिकाधिक निधी शासनाकडून मिळवून भाळवणी गटातील पंधरा गावांसाठी खर्च करावा अशी मागणी करण्यात आली. सांगोला विधानसभा मतदारसंघातील पंढरपूर तालुक्यातील भाळवणी गटातील १५ गावातील मतदार, आमदार शहाजीबापू पाटील यांना मताधिक्य देतील असा विश्वास व्यक्त केला.

## डॉ.बाबासाहेब देशमुख यांना डॉक्टर पत्नीची जोराची साथ शिट्टी वाजली अन् गाडी सुटली



**सांगोला । प्रतिनिधी**

शिट्टी वाजली अन् गाडी सुटली.अशीच प्रचिती आता सांगोला तालुक्यात येत आहे. गेली १५ दिवसापासून डॉ. बाबासाहेब देशमुख यांची धर्मपत्नी डॉ.निकिताताई बाबासाहेब देशमुख ह्या तालुकाभर गावभेटी देत प्रचार यंत्रणा राबवित आहेत.

स्व.आबासाहेबांचे विचार अजरामर ठेवण्यासाठी याही जीवाचे रान करीत आहेत. स्व.आबासाहेबांचे विचार, केलेल्या कामांना उजाळा देण्यासाठी डॉक्टर पती-पत्नी गेली चार वर्षापासून तालुक्यात काम करीत आहेत. उच्च विचार सरणी, साधे राहणीमान अशीच डॉ.बाबासाहेब यांची ही ओळख आहे. तालुक्यातील जनतेच्या मनावर यांनी अधिराज्य गाजविले आहे. त्यामुळे आबासाहेब प्रती बाबासाहेब अशी ही यांची ओळख आहे.यांच दरम्यान ताई ह्या सर्वांना समवेत घेत, तुम्ही सर्वचजण सुज्ञ नागरिक आहात. आबासाहेबांचे विचाराचे मानणारे आहात. इथून पुढे हेच विचार अन् त्यांच्याच प्रमाणे कार्य हे डॉ.बाबासाहेब देशमुख करतील. त्यामुळे सर्वांनीच जोमाने शिट्टी वाजवित विक्रमी मताने यांना विधानसभेत पाठवा, असे त्या आवाहन करत आहेत.

# गेवराईत बदामराव पंडितांच्या प्रचारासाठी आदित्य ठाकरेंची १२ नोव्हेंबरला जाहीर सभा

## हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा -युधाजित पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांची १२ नोव्हेंबर २०२४ रोजी गेवराई जाहीर सभा होणार आहे. या सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित यांनी केले आहे.

महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या प्रचारासाठी दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० : ३० वाजता युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांची गेवराई शहरातील आठवडी बाजार मैदान, दत्त मंदिर समोर येथे जाहीर सभा होणार आहे. या सभेला शिवसेना गेवराई विधानसभा मतदारसंघ निरीक्षक माजी आमदार सुनील धांडे, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, शिवसेना जिल्हा समन्वयक बाळासाहेब आंबुरे, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते जिल्हाप्रमुख चंद्रशेखर शिंदे, यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष भारतीय काँग्रेस पार्टी आणि मित्र पक्षाची सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

बदामराव पंडित यांच्या विजयावर शिक्का मोर्तब करण्यासाठी होणाऱ्या युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या जाहीर सभेला गेवराई मतदार संघातील मतदार व नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, उपजिल्हाप्रमुख महादेव आवटी उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, गेवराई मतदार संघ समन्वयक गणेश चव्हाण, गेवराई विधानसभा मतदारसंघ संघटक कानिफनाथ नागरे, तालुकाप्रमुख अजय दाभाडे, गेवराई तालुका संघटक सहाल चाऊस, युवा सेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, युवा सेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, शिवसेना किसान सेना तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुकाप्रमुख पठाण, युवा सेना शहर प्रमुख शेख शेहदाद यांनी केले आहे.





# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल तर्फे विविध उपक्रमाने संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

७ नोव्हेंबर १९०० रोजी भीमराव रामजी आंबेडकर यांनी सातारा येथील सरकारी विद्यालयात इंग्रजी पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता, तो दिवस महाराष्ट्र शासन ७ नोव्हेंबर २०१७ पासून शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी दिन म्हणून संपन्न करीत आहे. या दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने बलभीम नगर बुध्द विहार (शिवाजीनगर) येथे शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी व पालकांसमवेत विविध उपक्रमाने संपन्न केला. या कार्यक्रमास से.नि. शिक्षणाधिकारी सखाराम उजगरे अध्यक्षपदी लाभले तर प्रमुख पाहुणे म्हणून से.नि.सीईओ जि.प. बनसोडे पी.व्ही, से.नि.उपनिबंधक सहकार हनुमंत कांबळे, प्राचार्य सुशील गायकवाड, प्रा.बबीता गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, ॲड.राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी करुन महामानव अभिवादन ग्रुप व वाचनालय राबवित असलेल्या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड.तेजस वडमारे यांनी केले. सर्व प्रथम तथागतास पुष्प तर प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधतांना आयु.पी.व्ही.बनसोडे म्हणाले की, आजची तरुण पिढी इंटरनेट व मोबाईलच्या मायावी जगातून बाहेर पडून ग्रंथाच्या सहवासात राहून त्यांचे वाचन, चिंतन व मनन करुन माणसाशी माणसाने माणसासारखे वागणे गरजेचे आहे व तसे आचरणात आणणे आणि पालकांनी पाल्यांना लहानपणीच चांगल्या सवयी लावणे अत्यंत महत्वाचे असून पालकांनी आपली गरीबी शिक्षणाच्या आड येवू न देता पाल्यास सुसंस्कारीत करणे हाच खर्या अर्थाने शाळा प्रवेश दिन साजरा केला असे म्हणता येईल. या प्रसंगी प्रा.बबीता गायकवाड व हनुमंत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना व पाल्यांना अत्यंत सोप्या भाषेत जीवनातील पाल्याचे कर्तव्य व विद्यार्थ्यांची जबाबदारी अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली. शिकून पुढे गेलेल्यांनी समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेने निस्पृहपणे काम केले पाहिजे या बद्दल आग्रही मत मांडले व त्याकरीता वेळ व योग्य ती मदत करण्याचा निश्चय केला. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण झाला पाहिजे व त्यानुसार अंधश्रध्देपासून दुर रहाणे कसे हिताचे आहे हे विद्यार्थ्यांना व पालकांना बौध्द महासभेचे शहराध्यक्ष ॲड.केतन गायकवाड यांनी स्पष्ट केले. शाळा प्रवेश दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप तर्फे २६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही-पेन) वाटप करण्यात आले व पुढील शिक्षणाकरीता शुभेच्छा दिल्या. 'वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे' प्रातिनिधीक स्वरुपात जान्हवी वाघमारे, प्रिती जाधव, समृध्दी सोनवणे, विश्वास शिंदे, निशांत वडमारे व अंजली विशाल वडमारे या विद्यार्थ्यांचा आणि बालिका आधीरा निळकंठ वाघमारे हिने बोबड्या भाषेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शाळा प्रवेश दिनाबद्दल माहिती दिली म्हणून या सर्वांना सावित्रीमाई फुले यांचे जीवन चरित्र पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. तर ६ ज्येष्ठ महिलांनी विजुबाई अंकुटे, कमलबाई अंकुटे, संगमित्रा गायकवाड, शकुंतलाताई ससाणे, जयश्री वडमारे, संगीताबाई जाधव यांनी अनेक हाल-आपेष्ट सहन करुन आपल्या पाल्यास उच्च शिक्षणाची कास धरावयास लावली या बद्दल त्या सर्वांना महापुरुषांची जीवन चरित्र पुस्तके, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे संदीपान निर्मळ यांची स्व:लिखित 'राजगृह' कविता संग्रह व डी.एम. राऊत यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ विहाराकरीता भेट दिला. लहानपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचन संस्कृती वाढविण्याकरीता फिरते वाचनालयातर्फे ५० पुस्तकांचा संच परिसरातील विद्यार्थ्यांकरीता ॲड.तेजस वडमारे यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. पुस्तक वितरणाची जबाबदारी त्यांनी स्वयंस्फुर्त स्विकारली. अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष महोदयांनी बदलत्या शिक्षण प्रणाली मध्ये होत असलेल्या बदला बद्दल पालकांनी व विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी या बद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास पुण्यभूमीचे सुनील डोंगरे, सिध्दार्थ सूर्यवंशी, से.नि.केंद्र प्रमुख औसरमोल ए.एल., अमरसिंह ढाका, मीना आंकुटे, अर्चना जाधव, अंजली वडमारे, जयश्री गवळी, शिवकन्या खरमाडे, कोमल वाघमारे, आशा भालेराव व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता ॲड.केतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेम जोगदंड, राज जाधव, यश गवळी यांनी बहुमोल परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना वाचनालयातर्फे अल्पोपहार देवून सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

# माध्यम कक्षास जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या माध्यम कक्षास जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी आज भेट दिली. तसेच कक्षामध्ये सुरू असलेल्या जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज, मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमांच्या कामकाजांचा त्यांनी आढावा घेतला व मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी अर्पिता ठुबे, निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, स्वीपचे नोडल अधिकारी ओमकार देशमुख, प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, तहसीलदार अविनाश शिंगटे, माध्यम कक्षातील सहायक कक्ष प्रमुख राजश्री आचार्य, इंग्रजीच्या प्रोफेसर डॉ. संगीता ससाणे, हिंदीचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र सोनवणे, उर्दूचे अनुवादक शेख मोहम्मद काजिमोद्दीन यांच्यासह माध्यम कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



# निवडणूक निरीक्षक श्री नवीन व श्री कापसे यांनी केली मतदान केंद्रांची पाहणी



**जालना/असलम कुरेशी**

१०० घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांना भेटी देण्यासाठी निवडणूक निरीक्षक श्री नवीन व श्री कापसे यांचे पथक आले होते. त्यांनी विविध मतदान केंद्रांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

निवडणूक निरीक्षक श्री नवीन व श्री कापसे यांनी नगरपंचायत नवीन इमारत मतदान केंद्र क्रमांक १४४, १४५ व १४६ त्याचप्रमाणे केंद्रीय प्राथमिक शाळा घनसावंगी येथील मतदान केंद्र क्रमांक १४३, १५० व १५१ येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील सर्व भौतिक सुविधा व स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले. त्यांनी घनसावंगी विधानसभा मतरदार संघातील २५ मतदान केंद्रांची पाहणी केली. सर्व -चक्र मतदान केंद्रावर असण्याबाबत संबंधितांना सुचना दिल्या. तसेच मतदान उशिरापर्यंत चालणार असल्याकारणाने मतदान केंद्राच्या बाहेर प्रकाशाची व्यवस्था करण्याची सूचना दिली. प्रौढ, स्तनदा माता किंवा आवश्यकते प्रमाणे बेंचेसची व खुर्च्यांची व्यवस्था करावी असे सांगितले. निवडणूक निरीक्षक श्री. नवीन व श्री. कापसे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका नूतन वास्तूचे देखील निरीक्षण केले असता अतिशय कौतुकास्पद बाब त्यांच्या लक्षात आली व भावी पिढीसाठी सेल्फ स्टडीच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी होण्यासाठी एक आदर्शवत आभ्यासिका असावी, असे ते म्हणाले. त्याचप्रमाणे त्यांनी मच्छिंद्रनाथ चिंचोली अंतर्गत मतदान केंद्रांना भेटी दिल्या. घनसावंगी शहरातील सर्व मतदान केंद्र स्वच्छ व सुविधायुक्त असल्याचे निदर्शनास आले. यावेळी गट शिक्षणाधिकारी श्री. रवी जोशी, मनुष्यबळ विभाग निवडणूक श्री.इथापे, नायब तहसीलदार श्रीमती सोनवणे मॅडम, कैलास आरगडे, पर्यवेक्षक डीडी गुरसाळे व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

### हतबल व गोरगरीब जनतेला वाचवा
# धन दांडग्यांना परत परत मते देऊ नका-नितीन जायभाये
## सकल ओबीसी व सकल बहुजनांचे अपक्ष उमेदवार नितीन जायभाये यांचे जनतेला कळकळीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

गरीब मरतोय या देशात एक नवीन पांढरपेशी, विकृत कट्टरवादी, लबाड धनदांडग्याची व्यवस्था निर्माण होत आहे व जाणीवपूर्वक निर्माण केली जात आहे. विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समृद्ध संविधानाला काही ना काही युक्त्या करून संपवायचे-बदलवायचे आणि या देशातील जनतेला धनदांडग्यांचे गुलाम करायचे, अशी एकाधिकारशाही व भांडवलदारशाही व्यवस्था निर्माण करण्याचे काम चालू आहे. हे सर्व लोक कट्टरपंथी विकृत व निर्दयी आहेत यांना गोरगरीब जनतेचे काहीही देणे- घेणे नाही त्यांना फक्त त्यांच्यासाठी काम करणारे व मेहनत करणारे गुलाम पाहिजेत. हुकूमशाही व्यवस्थेचे ते समर्थक आहेत. त्याच दिशेने देशाला ते घेऊन जात आहेत. माझ्या भावंडांनो भगिनींनो माय माऊल्यांनो जागे व्हा जागे राहा, रात्र वैऱ्याचीच आहे. जागृतपणे, विचारपूर्वक योग्य माणसालाच मतदान करा. पांढरपेशी धनदांडग्यांनी उभे केलेल्या व गुलामगिरीची व्यवस्था निर्माण करू पाहणाऱ्या उमेदवारांना मतदान करू नका हे नम्र आवाहन मी आपल्या सर्वांना करत आहे.



### शेतकऱ्यांचे कर्ज माफ करुत-माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे
# महाविकास आघाडीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणीला ३ हजार रूपये देऊ
## लोह्यात एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या उध्दव ठाकरे यांच्या सभेला जनसागर उसळला

**लोहा । किरण दाढेल**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणीला ३ हजार रुपये महिना सुरू करून शेतकऱ्यांचे कर्ज पुन्हा माफ करूत यासाठी महाविकास आघाडीला निवडून द्या असे आवाहन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लोहा येथे शिवसेना उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या महाविकास आघाडीचे लोहा विधानसभेचे अधिकृत उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित परिवर्तन सभेत केले.



लोहा विधानसभेचे शिवसेना महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत परिवर्तन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे सचिव मिलिंद नार्वेकर लोहा विधानसभेचे शिवसेना महाविकास आघाडीचे उमेदवार एकनाथ दादा पवार, काँग्रेसचे खासदार शिवाजीराव काळगे , शिवसेनेचे लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेसचे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, शिवसेनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, सहसंपर्कप्रमुख मुक्तेश्वर धोंडगे, शिवसेनेचे लातूर जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्र महाविकास आघाडीचे सरकार असताना मोदी,शहा कायच भाजपाचे ही महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत नव्हती. आता येथील सर्व उद्योग गुजरातला पळवून नेलेत. महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भ ,कोकण सगळीकडे उद्योग सुरू करुन येथील युवकांना रोजगार द्यायचा होता पण मोदी - शहांनी येथील उद्योग गुजरातला नेले

भाजपा व मिध्देच्या पोस्टर बघा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आहे. येथे महाराष्ट्रात मोदी -शहाची गॅरंटी चालणार नाही तर बाळासाहेबांची फोटो चालेल.

भाजपावाले म्हणतात मला आदित्य ठाकरे व शरद पवार यांना सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचे पण अमित शहा तुम्ही तुमच्या ह्रदयावर हात ठेवून सांगा तुम्हाला पंतप्रधान व्हायचे की नाही . तुम्ही तुमच्या मुलाला जय शहा यांना क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष केले त्यांना क्रिकेट खेळता येते का? स्वतः चे ठेवायचे झाकून लोकांचे पाहायचे वाकुन असे चालणार नाही. मोदीजी ची धुळ्यात सभा झाली महाराष्ट्र त्यांना धुळ चालणार आहे. येत्या २० तारखेला भ्रष्टाचाराचे चाके असलेल्या महायुतीला महाराष्ट्रातून तडीपार करा.

येणारे सरकार आमचे आहे. तुम्हाला सुरतेला जाऊ देयाचे नाही. मला एकनाथ पवार यांनी सांगितले येथे दुसरा डमी एकनाथ पवार यांना उभे केले आहे.यांचे सर्वच डमी आहेत. यांनी माझा पक्ष चोरला ,चिन्ह चोरले, आता एकनाथ पवार यांना चोरले या गद्दाराच्या हाती तुम्ही सता देणार का? असा सवाल त्यांनी जनतेला केला व महाराष्ट्राच्या हितासाठी महाविकास आघाडीला विजयी करा असे आवाहन केले.

तसेच बाजुच्या नांदेड लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला विजयी करा व काँग्रेसवाल्यांनी मशालीला विजयी करावे असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले.

यावेळी कार्यक्रमांचे सूत्रसंचालन विक्रम कदम यांनी केले तर आभार संजय भोसीकर यांनी मानले.

यावेळी सभेला हजारोचा जनसागर उपस्थित होता.

सदरील सभा यशस्वी करण्यासाठी शिवसेनेचे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय ढेपे, शिवसेनेचे लोहा तालुकाप्रमुख संजय पाटील ढाले, काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील पवार, शिवसेनेचे शहरप्रमुख खंडू पाटील पवार, युवा सेनेचे सेनेचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील नंदनवनकर, युवा सेनेचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख सतीश पाटील बाबर , युवा सेनेचे लोहा अधिकारी गजानन पाटील मोरे, रूद्रा पाटील भोस्कर, यांच्या सहित महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## बदामराव पंडितांचे मतदारांना आवाहन

# तालुक्यातील जनतेचे नुकसान करणारा व्यक्ती एकच मताची विभागणी होईल असा निर्णय घेऊ नका



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील गोरगरीब जनता, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर यासह विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्ष यांच्या दृष्टीने सामान्य लोकांचे नुकसान करणारी व्यक्ती एकच आहे. गोरगरिबांना आडवा आडवी करून खोडाफोडीचे राजकारण करत पैशाची मस्ती दाखवणाऱ्यांना कायमचे घरी बसून आता घडविण्यासाठी महायुतीच्या आणि विशेषता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी मत विभागणी टाळावी आणि महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांनी केले आहे.

गेवराई मतदार संघात महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बदामराव पंडित यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली असून त्यांची काम करण्याची पद्धत आणि सरळ स्वाभिवृत्ती यामुळे सामान्य मतदार त्यांच्याकडे आकर्षिला गेला आहे. संघर्ष होता म्हणून जरांगे पाटील यांनीही उमेदवार न देता पाडापाडीचा संदेश दिल्याने महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित हे चांगलेच अडचणीत आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. भाजपचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार अपक्ष लढत असून अपक्षाला गेवराई तालुक्यातील जनता निवडून देणार नाही असेच वक्तव्य त्यांनी केल्याने आता त्यांच्याही लढण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याचवेळी प्रचारात मुसंडी मारलेल्या बदामराव पंडित यांनी मतदारांशी संवाद साधताना म्हटले की, गेवराई तालुक्याच्या विकासाचे आणि गोरगरीब सामान्य जनतेचे कंबरडे मोडण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार अमरसिंह पंडित आणि त्यांचे उमेदवार असलेले बंधू विजयसिंह पंडित यांनी केले आहे. गेल्या चाळीस वर्षापासून शासनाकडून येणाऱ्या गरिबांच्या योजना खऱ्या लाभार्थ्यांना न देता त्यातही राजकारण करण्याचे काम बीडच्या पंडितांनी नेहमीच केले आहे. शेतकऱ्यांच्या उसाचे राजकारण करून त्यांना अडवण्याचे काम केले. कापसाचे टोकन, तुरीचे टोकन हे गेवराई विकले गेले. त्यामुळेच त्यांना सहा विधानसभा निवडणुकीत पाच वेळेस पाडण्याचे काम या गेवराईतल्या सुज्ञ जनतेने केलेले आहे. यावेळी सुद्धा सगळ्यांच्या दृष्टीने शत्रू असलेली एकच व्यक्ती आहे आणि त्यांचा पराभव करायचा असेल तर आपल्या मतांमध्ये विभागणी न करता एकत्र येऊन सर्वांनी महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून, हातात मशाल घेत मला विधानसभेत जाण्यासाठी आशीर्वाद द्यावेत. नसता तालुक्यातल्या जनतेवर पश्चाताप करायची वेळ येईल असे रोखठोक प्रतिपादन महाविकास आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

गेवराई मतदार संघात करत असलेल्या दौऱ्यात त्यांच्या समवेत माजी सभापती पंढरीनाथ लगड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, अनिरुद्ध लोंढे, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुका अध्यक्ष तय्यब पठाण, शिवसेना किसान सेल तालुका अध्यक्ष सतीश सपकाळ, शिवसेना संघटक कानिफनाथ नागरे, संतराम काळे, सहाल चाऊस, युवासेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, युवासेना तालुकाप्रमुख गोविंद दाभाडे, शहर प्रमुख शहेदाद पिकाजी राठोड आदींची उपस्थिती होती.

## साळेगाव येथे कायदेविषयक जनजागरण शिबिर

**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील साळेगाव येथे केज तालुका विधिसेवा समिती आणि तालुका विधिज्ञ संघ आणि ग्राम पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने कायदे विषयक जनजागरण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

साळेगाव येथे ता. केज येथे दि ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९:०० वाजता हनुमान मंदिरा शेजारील सभागृहात तालुका विधिसेवा समिती, तालुका विधिज्ञ संघ आणि ग्राम पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने कायदे विषयक जनजागरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

केज न्यायालयाचे चौथे सहदिवाणी न्यायाधीश के. एन. निवडंगे यांच्या अध्यक्षतेखाली शिबिर संपन होत आहे. या शिबिराचे संयोजक आणि स्वागताध्यक्ष सरपंच कैलास जाधव पाटील हे आहेत.

शिबिरात अध्यक्ष सहदिवाणी न्यायाधीश के. एन. निवडंगे हे राष्ट्रीय न्यायसेवा दिवस या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर जेष्ठ विधीज्ञ सपाटे हे नगिकांचे मूलभूत कर्तव्ये आणि ड. मुंडे हे वैकल्पिक विवाद निराकरण आणि त्याचे फायदे यावर मार्गदर्शन करणार आहेत.

या शिबिराला वकील संघाचे अध्यक्ष ड. एम.एस. लाड, ड. इतापे, ड. जाधव, ड. सपाटे ड. देवधारे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ड. संतोष मिळाले तर प्रास्ताविक ड. सपाटे हे करणार आहेत. ग्रामस्थांनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजक सरपंच कैलास जाधव पाटील यांनी केले आहे.

## छगन भुजबळांनी जे लिहले ते खोटे असेल,तर फडणवीसांनी स्पष्टीकरण द्यावे

**पुणे (वृत्तसंस्था)**

छगन भुजबळांनी जे लिहले यातले काहीही खोटे असेल तर त्यांनी त्याबाबत स्पष्टीकरण द्यावे, असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी गृहमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.राजदीप सरदेसाई यांनी एक पुस्तक लिहले आहे, त्यांच्या पुस्तकामध्ये एक मोठा दावा करण्यात आला आहे. मी या विषयावर संसदेतही अनेकदा बोलली आहे. माझ्या अनेक भाषणात मी सांगितले की यंत्रणेचा गैरवापर करत पक्ष फोडणे, घर फोडणे हे पाप आणि असंविधानिक गोष्टी अदृक्ष शक्ती हे संपूर्ण देशात सुरू आहे, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी छगन भुजबळांच्या दाव्याबद्दल बोलताना म्हटले आहे.सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, माध्यमांनुसार ९५ टक्के ईडी, आयकर आणि केंद्रीय यंत्रणाचा गैरवापर विरोधकांवर सुरू आहे, असे मी अनेकदा सांगितले आहे, त्याचा उल्लेख राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकात केल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, एका लोकशाहीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या मार्फत पारदर्शक निवडणूक व्हावी यासाठी आमचा प्रयत्न असतो. आमच्या मविआच्या आणि मित्रपक्षाचा आम्ही एकत्र प्रचार करत आहोत.सुप्रिया सुळे म्हणाल्या की, माझे देवेंद्र फडणवीस यांना आव्हान आहे, तुम्ही म्हणाल ती वेळ तुम्ही म्हणाल ती जागा आणि तुम्ही पाहिजे तेवढे कॅमेरे घेऊन या.

## प्रस्थापितांना वैतागलेला गेवराईकर म्हणतोय, आता फक्त पुजाताईच





**गेवराई। । प्रतिनिधी**

प्रस्थापितांकडून होत असलेले तेच तेच राजकारण आणि एवढ्या वर्षात विकासच बघायला न मिळाल्याने वैतागलेले शेतकरी आणि सर्वसामान्य जनता यंदा गेवराई विधानसभेत परिवर्तन करण्याच्या तयारीत आहे, नवा आणि फ्रेश चेहरा, शिवाय शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या कामाला नेहमीच उपलब्ध असणार्या पूजाताई मोरे यांना गेवराई मतदारांतून वाढता पाठिंबा मिळत आहे.

गेवराईचे राजकारण हे पंडित आणि पवार या भोवतीच फिरत आले आहे. या प्रस्थापित घराण्यांनी विकासाची खोटी आश्वासने देत आजवर लोकांच्या मतावर राज्य केले. प्रत्येक वेळी तेच तेच राजकारण आणि तेच तेच चेहरे बघून मतदार संघातील जनता वैतागली आहे. विशेष करून शेतकरी वर्ग आणि सर्वसामान्य या राजकारणाला आणि अविकसितपणाला कंटाळले असून, यंदा परिवर्तन घडवायचे असा संकल्प त्यांनी केल्याचे दिसत आहे. याचसाठी नवा पर्याय म्हणून पूजाताई मोरे यांच्याकडे बघितले जाते. शेतकरी आणि सर्वसामान्य जनता याबाबत खुलेआम बोलू लागली आहे. यंदा परिवर्तन घडवायचेच आणि जे आपला प्रश्न लावून धरतील त्यांना निवडून द्यायचे, असा विचार मतदारांनी केला आहे. पुजाताई मोरे यांनी शेतकर्यांसाठी आजवर केलेले कार्य आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी उठविलेला आवाज जनतेला ठाऊक आहे. यामुळे त्यांच्या प्रचाराला सध्या प्रचंड मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. शुक्रवारी पूजाताई मोरे यांनी मतदार संघातील टाकळगव्हाण, शिर्डी बुद्रुक, बाबुलतारा, टाकरवण, तपेलिमगाव, दत्तबाग, रामनगर, शेलगाव, रिधोरी, कवडगाव, सुर्डी नजीक, राजेगाव आदी ठिकाणचा दौरा करीत मतदारांच्या भेटी घेतल्या. या सर्वच ठिकाणचे शेतकरी आणि सर्वसामान्यांनी पूजाताई मोरे यांना भरभरून पाठिंबा देताना, आम्हाला बदल घडवायचा असून आम्ही तुमच्याच सोबत आहोत असे आश्वासित केले.

### फडावर जात ऊसतोड कामगारांची घेतली भेट

**दौर्या दरम्यान पूजाताई मोरे यांनी उसाच्या फडात काम करीत असलेल्या ऊस कामगारांची भेट घेतली. ऊसतोड कामगारांच्या व्यथा आणि त्यांच्या समस्या यांची जाणीव पूजाताई मोरे यांना चांगल्या प्रकारे आहे. त्यांच्या हक्कासाठी सुद्धा त्यांनी यापूर्वी लढा दिलेला आहे. यावेळी ऊसतोड कामगारांनी पूजाताई मोरे यांचे कौतुकही केले. तुमच्या हक्कासाठी मी सदैव लढत राहणार असून, तुमच्या आरोग्यदायी जीवनासाठी, लेकरांच्या शिक्षणासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे पूजाताई मोरे यांनी यावेळी सांगितले.**

## उरणच्या चारही जिल्हा परिषद गटात प्रितम म्हात्रेंना मतांची भरघोष आघाडी मिळणार

### प्रितम दादांना तरुणांचा वाढता पाठिंबा



**विठ्ठल ममताबादे । उरण**

विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाचे धडाडीचे लढाऊ युवा नेतृत्व प्रीतमदादा म्हात्रे यांना उरण तालुक्यातील चाणजे,नवघर, जासई व कोप्रोली या चारही मतदारसंघातून प्रचंड बहुमत मिळणार आहे. त्यासाठी या परिसरातील तरुणांचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा वाढ झाली आहे. यात उरण तालुक्यातील तरुण सक्रिय झाले आहेत. आता आम्हाला आमच्या हक्काचा भूमिपुत्रांना न्याय देणारा प्रीतमदादाच्या रूपाने आमदार हवा आहे. आशा प्रतिक्रिया तरुणांकडून व्यक्त केली जात आहे. उरण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या गटातील अनेक गावातून तरुण आणि युवा मतदार उत्स्फूर्तपणे बाहेर पडू लागला आहे. त्यामुळे संपूर्ण तालुक्यातील चित्रच बदलल आहे. समाजात सर्वसामान्य नागरिकांना सर्वतोपरी सदैव सहकार्य करण्यासाठी तत्पर असलेले प्रीतमदादा यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याने भारावून शेकडो तरुण गावोगावातील प्रचारात सक्रिय झाले आहेत. आजपर्यंत त्यांनी वैयक्तिक ५००० पेक्षा जास्त कुटुंबाला रोजगार दिला आहे. त्या उलट विरोधकांनी आता पर्यंत नुसत्या आश्वासन आणि घोषणाना आपण भूललो आहोत. यापुढे भुलणार नाही. संपूर्ण युवाशक्ती दादांच्या पाठी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरून दादांचे काम तळागाळात पोहोचवणार.

यावेळी उरण विधानसभा मतदारसंघात परिवर्तन घडवून आणणार आणि तरुणांचे आदर्श प्रीतमदादा म्हात्रे यांना प्रचंड मतांनी विजयी करून आमचा भूमिपुत्रांचा हक्काचा रोजगाराची समस्या सोडवणारा आमदार निवडून आणणार असा निर्धार उरण मधील तरुणांनी केला आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली ॲड.प्रकाश आंबेडकर यांची भेट



**पुणे । प्रतिनिधी** -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुण्यातील शिवाजी नगर येथे प्रचाराला आले असता, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांची त्यांनी भेट घेतली व प्रकृतीची विचारपूस केली.काही दिवसांपूर्वी ड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर अँजीओप्लास्टी झाली होती. त्या पार्श्वभूमीवर अनेक नेते त्यांची भेट घेत आहेत.

## पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी संगीता ठोंबरे यांनी कंबर कसली

### साठे व ठोंबरे यांच्या संयुक्त दौऱ्याला होत आहे गर्दीच गर्दी

**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी विधानसभा निवडणूकीतून उमेदवारी माघारी घेतल्यानंतर आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. त्यांच्यावर राष्ट्रवादीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.पक्षाची जिम्मेदारी मिळतात पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासाठी माजी आमदार संगीताताई ठोंबरे ह्या मतदारसंघात आपल्या जिवाचे रान करताना दिसून येत आहे. बीड जिल्ह्याचे खा. सोनवणे यांच्या उपस्थितीत माजी आ. संगिता ठोंबरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

यावेळी ठोंबरे यांना पक्षाच्या वतीने मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र ठोंबरे यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे.माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांची निवड होतात त्यांनी केज विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारासाठी चांगली कंबर कसली आहे त्यांनी मतदारसंघातील अनेक गावांना भेटी दिल्या आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077